भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक २८.११.२०२० ते ०२.१२.२०२०)

| अंक ९४/२०२० | | | | | | | दिनांक २७.११.२०२० | कालावधी ५ दिवस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२०/११/२०२० ते २६/११/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता २८/११/२०२० ते ०२/१२/२०२० पर्यंत) | | | | |
| २०/११ | २१/११ | २२/११ | २३/११ | २४/११ | २५/११ | २६/११ | दिनांक | २८/११ | २९/११ | ३०/११ | ०१/१२ | ०२/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ३ | ३ | ० |
| ३७.० | ३६.५ | ३६.५ | ३६.० | ३६.० | ३५.० | ३५.० | कमाल तापमान (अं. से) | ३५ | ३४ | ३४ | ३४ | ३५ |
| २३.० | २३.० | २०.० | १९.० | २१.० | १८.० | १६.५ | किमान तापमान (अं. से) | २२ | २२ | २२ | २३ | २२ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | मेघाच्छादन (ऑक्टा.) सकाळ | ७ | ४ | २ | ७ | ८ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) दुपार | | | | | |
| ८५ | ८७ | ९१ | ८९ | ९१ | ८९ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ६६ | ८२ | ८३ | ७४ | ६७ |
| ५१ | ४३ | ४६ | ४६ | ४६ | ४३ | ४६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४० | ५८ | ४९ | ४६ | ३८ |
| ०.८ | १.१ | ०.४ | ०.५ | ०.६ | ०.५ | ०.१ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ०१० | ००९ | ००६ | ००७ | ००८ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | वा-याची दिशा सकाळ | ईशान्ये कडे | पुर्वे कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वे कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे |
| पश्चिमोत्तर/ नैऋत्य | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ आग्नेय कडे | स्थिर | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | वा-याची दिशा दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ४८४०.४ | ४८३७.२ | ०.० |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक २८ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर, २०२० या कालावधी दरम्यान दिनांक ३० नोव्हेंबर व ०१ डिसेंबर या दिवसा व्यतिरिक्त पर्जन्यमान कोरडे राहण्याची शक्यता आहे तर ३० नोव्हेंबर व ०१ डिसेंबर रोजी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. त्याचबरोबर कमाल तापमानात काही अंशी घट होऊन हवामान कोरडे व मुख्यत्वे ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| इशारा | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसासाठी प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून पर्जन्यासंबधी कोणताही ईशारा देण्यात आलेला नाही. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | येत्या ५ दिवसात वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने नविन लागवड केलेल्या आंबा, काजु कलमांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा. वाढणा-या तापमानाची व कोरड्या वातावरणाची शक्यता लक्षात घेता नविन लागवड केलेल्या आंबा, काजु कलमांना व नारळ, सुपारीच्या रोपांना पाणी देण्याची व्यवस्था करावी. त्याचबरोबर वेलवर्गिय फळभाज्या, पालेभाज्या, मिरची, टोमॅटो, वांगी, नवलकोल इत्यादी पिकाखालील क्षेत्र तणविरहीत ठेवुन त्यास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | दिनांक ३० नोव्हेंबर व ०१ डिसेंबर रोजी दक्षिण कोकणात हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | पिक निहाय कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | नवीन पालवी | येत्या ५ दिवसात वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने नविन लागवड केलेल्या आंबा कलमांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा.<br>नवीन आंबा लागवडीमध्ये कलमांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे.<br>मोठया आंबा बागेमध्ये वाढलेले झाडे झुडपे व तण काढून बागेची स्वच्छता करून घ्यावी.<br>पुढील ५ दिवसांमध्ये ढगाळ वातावरण व हलक्या स्वरुपाची शक्यता लक्षात घेता आंबा पालवीवर तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशी यापासून आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिलि प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| काजु | नवीन पालवी ते फुलोरा | येत्या ५ दिवसात वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने नविन लागवड केलेल्या काजु कलमांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा.<br>येत्या ५ दिवसात सापेक्ष आद्रतेमध्ये घट होउन कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता नवीन लागवड केलेल्या कलमांच्या बुंधा स्वच्छ करून बुंध्यालगतची जागा खणून घ्यावी तसेच पाणी देण्याकरीता गोलाकार आळे तयार करून वाळलेल्या गवताचे आच्छादन द्यावे. नवीन काजु लागवडीमध्ये कलमांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे.<br>मोठया काजू बागेमध्ये वाढलेले झाडे झुडपे व तण काढून बागेची स्वच्छता करून घ्यावी.<br>गेल्या आठवड्यामध्ये वाढलेले तापमान व कोरड्या वातावरणामुळे काजु पिकांमध्ये पाण्याचा ताण निर्माण होऊन काही ठिकाणी मोहोर दिसत आहे. त्याचबरोबर पुढील ५ दिवसामध्ये हलक्या स्वरुपाचा पाउस व ढगाळ वातावरणाची शक्यता लक्षात घेता काजुतील मोहोराचे ढेकण्या व फुलकिडीपासुन संरक्षण करणे गरजेचे आहे. प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. किंवा प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही/१० मि.ली. प्रति १० लि. पाण्यातून फवारणी करावी.<br>काजूचे उत्पन्न वाढविण्यासाठी स्वस्त अषा सुकलेल्या माष्यांचा अर्क ५०० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यातून पहिली फवारणी फुलो-याच्यावेळी तर दसुरी फवारणी पहिल्या फवारणी नंतर १५ दिवसांनी करावी.<br>काजु बियांचे उत्पादन वाढविण्यासाठी १० पी पी एम या संजीवकाची दुसरी फवारणी मोहोर येताना करावी.<br>काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. |

| | | |
|---|---|---|
| | | फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| नारळ व सुपारी | - | येत्या ५ दिवसात वा-याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने नविन लागवड केलेल्या नारळ व सुपारीच्या रोपांना बांबुच्या काठीचा आधार द्यावा. |
| वायंगणी भात | रब्बी पेरणी | रब्बी हंगावातील भात लागवडीच्या पुर्व तयारीस सुरुवात करावी. उन्हाळी भात पीकासाठी १ हेक्टर क्षेत्र लागवडीसाठी १० गुंठे क्षेत्रात गादीवाफे तयार करुन घ्यावेत. जमिनीचा उतार लक्षात घेऊन निच-याच्या जागी तळाशी १२० सेमी आणि प्रृष्ठभागाशी ९० सेमी रुंदीचे ८ ते १० सेमी उंचीचे योग्य त्या लांबीचे गादी वाफे तयार करावेत. वाफ्यात प्रती गुंठा क्षेत्रास १ किलो युरिया व १.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे. बियाण्यास ३% मिठाच्या द्रावणाची (३०० ग्रम मीठ/१० लि. पाणी) प्रक्रिया करावी. वाफ्यावर ५ ते ८ से.मी. अंतरावर ओळीमध्ये १ ते २ सेमी खोलीवर बी पेरुन घ्यावे. जाड दाण्यांच्या जातीसाठी ५० किलो तर बारीक दाण्यांच्या जातीसाठी ४० किलो बियाणे वापरावे. वायंगणी भात पीकाची पेरणी सुधारीत बियाण्यांचा वापर करुन करावी. |
| भुईमुग | रब्बी पेरणी | रब्बी उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी शेताच्या पुर्वतयारीची कामे हाती घ्यावी. जमिन खोल नांगरुन, ढेकळे फोडुन व हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट मिसळुन तयार करावी. पेरणीसाठी टी.जी.२६, टी.ए.जी.२४, टी.पी.जी.४१, कोकण गौरव, कोकण टपोरा या जातींचे बियाणे हेक्टरी १२५ ते १५० किलो या प्रमाणात वापरावे. |
| सुर्यफुल | रब्बी पेरणी | रबी सुर्यफुल लागवडीसाठी जमिन उभी-आडवी खोल नांगरुन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टर १० ते टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट जमिनीवर पसरुन मातीत मिसळावे. पेरणीसाठी. पेरणीसाठी सुर्यफुलाच्या मॉर्डन, एस.एस.५६, बी.एस.एच-१ इ. सुधारीत जातींचा वापर करावा. हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे वापरावे. पेरणीपुर्वी बियाणे १२ तास पाण्यात भिजवुन नंतर सावलीत वाळवावे. तसेच प्रती किलो २ ग्रम या प्रमाणात बुरशीनाशक चोळावे. |
| मोहोरी | रब्बी पेरणी | मोहरी पिकाच्या पेरणीसाठी हवामान योग्य असल्याने पुसा बोल्ड किंवा वरुणा या जातीची लागवड करावी. पिकाची पेरणी ४५ x १० से.मी अंतरावर ३ ते ४ से.मी. खोल करावी. पेरणीपुर्वी प्रती गुंठ्यास १ किलो युरिया आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट ओळीत पेरुन द्यावे. |
| कुळीथ | पेरणी | रब्बी हंगामातील कुळीथ पिकाची पेरणी १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेर पर्यंत करावी.<br>कुळीथाच्या पेरणीसाठी दापोली - १ या पिकाच्या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>कुळीथ पिकाची पेरणी ३०x१५ सेमी या अंतरावर करावी. साधारणतः कुळीथासाठी प्रती हेक्टरी १८ ते २० किलो बियाणे पुरते, बियाण्यास प्रती किलोस २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. कुळीथासाठी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत सरीमध्ये बुजवुन द्यावी. |
| चवळी | पेरणी | रब्बी हंगामातील चवळी पिकाची पेरणी १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेर पर्यंत करावी.<br>चवळी पिकाच्या पेरणीसाठी कोकण सदाबहार, कोकण सफेद या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>चवळी पिकाची पेरणी ३०x१५ सेमी या अंतरावर करावी. साधारणतः चवळीसाठी प्रती हेक्टरी १५ ते १८ किलो बियाणे पुरते, बियाण्यास प्रती किलोस २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. चवळीसाठी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत सरीमध्ये बुजवुन द्यावी. |
| कडवा वाल | पेरणी | पिकाची पेरणी ऑक्टोबर व नोव्हेंबर मध्ये ३०x१५ सेमी किंवा ३०x२० सेमी किंवा ३०x३० सेमी या अंतरावर नांगरा पाठोपाठ करावी.<br>पेरणीसाठी पिकाच्या कोकण वाल -१ व कोकण वाल -२ या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>पाभरीणे पेरणी केल्यास साधारणतः प्रती हेक्टरी ५० ते ६० किलो बियाणे पुरते. बियाण्यास प्रती किलोस ३.० ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी.<br>पिकास ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत बियाण्याखाली साधारण ५ सेमी खोलीवर द्यावी. |
| कलिंगड | फळ धारणा | कलींगड पीकाच्या लागवडीसाठी शुगरबेबी या जातीचे खात्रीशीर बियाणे मिळवून सरी पदधतीने 4 x 1 मि. अतंरावर सरीच्या दोन्ही बाजूस टोकणी करावी. बीयाण्यास थायरम हे बुरशीनाशक 3 ग्रॅम/किलो बियाणे या प्रमाणात चोळावे. |
| माती परिक्षण | - | जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाशचे प्रमाण तपासण्यासाठी खरीप पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमुना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परिक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमुना कसा घ्यावा याबाबत अधिक माहितासाठी मृद शास्त्रज्ञ, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले यांचेकडे संपर्क साधावा (दुरध्वनी क्र. 02366-262234) |
| दुभती जनावरे, शेळया, कुक्कुटपालन | | जनावरांचे व पक्ष्यांचे दुपारच्या उष्णतेपासून योग्य ते संरक्षण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ओफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |